विशेष शाखा, पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे - ३३
दुरध्वनी क्र. ०२०-२७३५०१२०
ई मेल आयडी – dcphq.pcpc-mh@gov.in

जा क्र/ पो आ / १२८६/२०२३, पिंपरी चिंचवड, दि.१६/०२/२०२३

प्रतिबंधात्मक आदेश

**विषय :- फौजदारी प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४(१) नुसार हिंजवडी, वावधान संवेदनशिल व महत्वाच्या ठिकाणी व संपुर्ण पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये ड्रोन व ड्रोन सदृश्य कॅमेराने छायाचित्रण (शुटींग) करण्यास प्रतिबंधात्मक आदेश...**

**संदर्भ : - टी.पी.नं.१९/ अे/के.गृ.म.२०२३ भारत सरकार गृह मंत्रालय दि. १४/०२/२०२३ अन्वये..**

-----ooo-----

**ज्याअर्थी, अतिमहत्वाची व्यक्ती ह्या दिनांक १८/०२/२०२३ रोजी पिंपरी चिंचवडच्या दौ-यावर असून त्या भेटी दरम्यान ते हिंजवडी येथील कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. क्रिमीनियर न्यु दिल्ली (जॉईन्ट डायरेक्टर/व्हीएस२३/व्हीएस/२०२२(१)) दि. ३०/११/२०२२ अन्वये अतिमहत्वाचे व्यक्तीच्या भेटीदरम्यान सुरक्षेच्या दृष्टीने घावयाच्या दक्षतेबाबत सुचनांचे पत्र प्राप्त झालेले आहे.**

अतिमहत्वाची व्यक्ती ह्या पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयांच्या हददीतील हिंजवडी, हॉटेल टिप टॉप, पुणे बेंगलोर हायवे येथील कार्यक्रमास उपस्थित राहणार आहे. त्यांना इंडियन मुजाहिददीन, लष्कर-ए-तौयबा, जैश-ए-महंमद, माजी सिमी संघटना सदस्य, कबीर कलामंच नवयान जलसा,नक्षलवादी संघटना, अतिरेकी संघटना अशा अनेक संघटनापासून त्यांच्या जिवीतास धोका असल्याने व त्यांच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी त्यांच्याबरोबर इतर महत्वाचे व्हीव्हीआयपी असल्याने सदर ठिकाणी मोठया प्रमाणात गर्दी होवून.काही लोक ड्रोनव्दारे किंवा ड्रोन सदृश्य कॅमेराव्दारे छायाचित्रण (शुटींग) करण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे अलिकडच्या काळातील वाढते दहशतवादी हल्ल्यांचा, घातपात कारवायांचा विचार करता ड्रोन सारखे इलेक्ट्रीक साधन वापर करुन घातपात होण्याची शकयता नाकारता येत नाही. त्यामुळे अचानक ड्रोनद्वारे चित्रीकरण करण्यात आले तर कार्यक्रमाच्या ठिकाणी गडबड गोंधळ उडुन चेंगराचेंगरी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत माझी खात्री झाली आहे.

**त्याअर्थी, मी विनयकुमार चौबे पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४(१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार जारी करण्यात आलेले प्रतिबंधात्मक आदेश कायम ठेवुन.**

पुणे जिल्ह्यातील हिंजवडी, हॉटेल टिप टॉप,पुणे बेंगलोर हायवे लगत, कार्यक्रमाचे ठिकाणी, ऑक्सफर्ड हेलीपॅड वावधान व व्हीव्हीआयपी यांचे येण्याजाण्याच्या मार्गालगत ०३ किलोमीटरच्या आजुबाजुच्या परिसरामध्ये व संपुर्ण पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये दिनांक १७/०२/२०२३ रोजी ००.०० पासून ते दिनांक १९/०२/२०२३ रोजीच्या २४/०० वा.पर्यत सर्व प्रकारच्या ड्रोनव्दारे छायाचित्रीकरण करण्यास तसेच सर्व प्रकारचे ड्रोन उडविण्यास व वापर करण्यास **प्रतिबंध करण्यात येत आहे.**

उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. यावावतची माहीती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहा. पोलीस आयुक्त, परिमंडळीय पोलीस उपायुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरीकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदर मनाई आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश दि. १६/०२/२०२३ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला आहे.

**तारीख- १६ /०२/२०२३**
**ठिकाण- पिंपरी चिंचवड.**

पोलीस आयुक्त पिंपरी-चिंचवड

(विनयकुमार चौबे) 16/2
पोलीस आयुक्त
पिंपरी चिंचवड

Scanned with AltaScanner

प्रति,

मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग

मा. जिल्हाधिकारी, पुणे

मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका

मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

सर्व पोलीस आयुक्त, पोलीस अधिक्षक महाराष्ट्र राज्य

उप विभागीय प्रांत अधिकारी, खेड व हवेली

तहसिलदार, खेड व हवेली

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ व २

सर्व सपोआ, पिंपरी चिंचवड. सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पिंपरी चिंचवड

Scanned with AltaScanner